#MahaMarathon /MahaMarathon
नाशिकसाठी एक महासंधी महाध्येय साधायची!
8 ऑक्टोबर 2017
स्पर्धा
Family Run - 3 Kms
Fun Run - 5 Kms
Power Run - 10 Kms
Half Marathon - 21 Kms
Registrations Open
नोंदणी सुरु
लोकमत
Nashik Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
8 ऑक्टोबर 2017
नोंदणीसाठी www.mahamarathon.com/nashik/
नोंदणीसाठी पत्ता :
लोकमत मीडिया प्रा. लि., सुयोजित ट्रेड सेंटर, शरणपूररोड, नाशिक. फोन-६६४७५२६


महामॅरेथॉन स्पर्धेत सहभाग निश्चित करणारे बीएसएनएलचे अधिकारी व कर्मचारी



स्पर्धेत सहभाग नोंदविताना संदीप फाउण्डेशनचे अध्यक्ष संदीप झा. समवेत चेतन चौधरी, लोकमतचे सहायक उपाध्यक्ष बी.बी. चांडक, डॉ. डी.डी. देशमुख, फिलिप्स स्टॅण्डली, आरिफ मन्सुरी.

## नाशिक महामॅरेथॉन : नोंदणीसाठी नाशिककरांचा उत्साह

# आज चार ठिकाणी विशेष नोंदणी केंद्रे

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** आरोग्य जनजागृती आणि ॲथलिट क्रीडा प्रकाराला प्रोत्साहन मिळावे यासाठी लोकमत वृत्तपत्र समूहाच्या वतीने नाशिकमध्ये येत्या दि. ८ ऑक्टोबर रोजी महामॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेमध्ये सर्वच गटातील स्पर्धकांकडून चांगला प्रतिसाद लाभत असून, शनिवारी (दि. ९) शहरातील चार महत्त्वाच्या ठिकाणी नोंदणी केंद्रे सुरु करण्यात येत आहेत. या केंद्रांवर नाशिककरांना नावे नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

नाशिकचा महाउत्सव म्हणून महामॅरेथॉन स्पर्धेविषयी नाशिककरांमध्ये कमालीचा उत्साह असून, सर्वच थरातून या स्पर्धेच्या नोंदणीला प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. नामवंत धावपटू कविता राऊत, मोनिका आथरे यांनीदेखील सहभाग निश्चित केला असून, त्यांनी नाशिककरांना या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. मॅरेथॉनचे हब असलेल्या नाशिकमध्ये लोकमतच्या वतीने होत असलेल्या या स्पर्धेबाबत सर्वच क्रीडा प्रकारातील खेळाडूंमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. नोंदणीसाठी मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता शनिवारपासून शहरात नोंदणीची केंद्रे खुली करण्यात आली आहेत.

शनिवारपासून शहरातील गोल्फ क्लब मैदान, कृषीनगर, इंदिरानगर जॉगिंग ट्रॅक आणि गंगापूर रोडवरील साधना मिसळ येथे नावनोंदणी केली जाणार आहे. सकाळी १० वाजता नावनोंदणीस प्रारंभ होणार आहे. लोकमत महामॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्याची नाशिककरांना संधी असून, शहरातील या चारही केंद्रांवर नागरिक सहभाग नोंदवू शकणार आहेत. या चारही ठिकाणी लोकमतचे बॅनर, पोस्टर्स लावण्यात येणार असून, स्पर्धेतील सहभागाबाबतचा अर्ज इच्छुक दाखल करू शकणार आहेत. शहरातील अनेक नामवंत डॉक्टर्स, वकील, इंजिनिअर्स, शासकीय अधिकाऱ्यांनी स्पर्धेत सहभागी होण्याची तयारी दर्शविली असून, विविध शासकीय, निमशासकीय तसेच खासगी संस्थांनी ग्रुप बुकिंगला प्राधान्य दिले आहे.



एचडीएफसी होम लोनचे डीजीएम संदीप कुलकर्णी, समवेत बिझनेसमेंट डेव्हलपमेंट मॅनेजर एचडीएफसी लिमिटेडचे समीर दातरंगे.

### जागृती आणि संवर्धनाचा स्तुत्य उपक्रम

आरोग्य संवर्धन आणि ॲथलेटिक्स जनजागृती हे अतिशय चांगले उपक्रम लोकमतने हाती घेतले आहेत. त्यांच्या उपक्रमाला शुभेच्छा. खेळाच्या निमित्ताने सुदृढ नाशिकचा संदेश देण्यासाठी स्पर्धा मोलाची ठरणार आहे. नाशिककरांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही स्पर्धा आरोग्यवर्धक ठरणारी आहे. या स्पर्धेत मी स्वत: सहभाग नोंदविला आहे. तमाम नाशिककरांनी या स्पर्धेत सहभागी होऊन सुदृढ आणि सक्षम नाशिकचा संदेश देण्यासाठी एकत्र येण्याची अपेक्षा आहे. - **संदीप कुलकर्णी,** डीजीएम, एचडीएफसी होम लोन

### पारितोषिक

- 'महामॅरेथॉन' स्पर्धेअंतर्गत विविध गटातील पहिल्या सत्तर स्पर्धकांना रुपये सहा लाखांपर्यंतची पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, तसेच दहा कि.मी. आणि अर्ध मॅरेथॉन पूर्ण करणाऱ्या पहिल्या दहा स्पर्धकांना मेरिट सर्टिफिकेट, स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक धावपटूला आकर्षक मेडल, टायमिंग सर्टिफिकेट आणि 'डिफेन्स कप' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



दिल्ली पब्लिक स्कूलचे संचालक सिद्धार्थ राजघराणा.

Associate Sponsors: HDFC WITH YOU, RIGHT THROUGH | FRAVASHI INTERNATIONAL ACADEMY | DEEPAK BUILDERS & DEVELOPERS
Food & Beverage Partner: Frut-X Fortune Foods
Hospitality Partner: Express Inn The Business Luxury Hotel - Nashik
Pride Partners: SAPKAL KNOWLEDGE HUB
Health Partner: Apollo HOSPITALS NASHIK
Health Mapping Partner: IIFW REDEFINE YOURSELF
Partners: Roongta Group Builders & Developers | SAN COMPUTEK | INFOTEK | बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra ONE FAMILY ONE BANK | KITCHEN ESSENTIALS Rasoi ka makeover
Official Energy Drink Partner: Enerzal
Sporting Accommodation Partner: istay sporty making sports happen
Logistics Partner: YOU TOO CAN RUN
Health & Fitness Partner: RELAX - ZEAL
Outdoor Partner: SHREE ADVERTISERS Sachin Gite - Patil 9890024365